MHSN090005912019

# सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जि. सांगली.

(पीठासिन अधिकरी श्री. एस.वाय.वाकचौरे)

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ७२/२०१९.**
**निशाणी क्रमांक ४८ खालील आदेश.**

| | | |
|---|---|---|
| ०१. | स्वप्नील भोसले व इतर. | **वादी.** |
| | ***विरुध्द.*** | |
| ०१. | राजाराम भोसले वगैरे | **प्रतिवादी.** |

**(०१).** प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.६ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार वादीचा दावा खारीज करण्यासाठी दाखल केलेला आहे.

**(०२).** अर्ज व त्यावर वादीने दाखल केलेल्या जबाबाचे अवलोकन केले. प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. आर. व्ही. जोशी व वादींतर्फे विद्वान वकील श्री. ए. बी. डांगे यांचा युक्तिवाद ऐकला.

**(०३).** अभिलेखावरील परस्पर विरोधी कथने विचारात घेवून खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात त्यांची उत्तरे मी निष्कर्षासह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रस्तुतचा अर्जातील विनंतीनुसार वादीचा दावा नामंजूर होण्यास पात्र आहे काय ? | नकारार्थी. |
| २ | आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीताः**–

(०४). प्रतिवादींचे थोडक्यात कथन असे की, वादीने सदरचा दावा वाटपासाठी, जाहीर ठरावासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. सन १९८९ रोजी मा. तहसिलदार यांच्या समोरील झालेल्या वाटपानुसार दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ यांना मिळाले आहे. सदर वाटपानुसार दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ यांच्या स्वतंत्र मालकीहक्काची मिळकत झालेली होती. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.६ यांच्या नावे कायम खरेदीपत्र करून दिलेले आहे. सदर खरेदीपत्रानुसार सन २००९ पासून प्रतिवादी क्र.६ हे दावा मिळकतीची वहिवाट करतात. सदर मिळकतीमध्ये वादींचा वडीलार्जित हक्क व हिस्सा कधीही नव्हता व नाही. वडीलार्जित मिळकतीचे रितसर वाटप झाल्यानंतर ती ज्याला वाटपाने मिळाली आहे त्याची ती मिळकत स्वतंत्र मालकीची मिळकत होते. प्रतिवादी क्र.१ यांनी कौटुंबिक हितासाठी, मुलीच्या लग्नासाठी व पतसंस्थेचे कर्ज भागविण्यासाठी सदर मिळकत प्रतिवादी क्र.६ यांना विक्री केली आहे. प्रस्तुत वादीस दावा करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. दाव्यात नमूद केलेले कारण पूर्णपणे खोटे व बेकायदेशीर आहे. सुमारे १२ वर्षाच्या कालावधीपासून प्रतिवादी क्र.६ हे निरंतर मालकी हक्काने सदर मिळकत उपभोगत आहेत. त्यामुळे वादीला वाटप व कब्जा मागण्याचा अगर मनाई हुकूम मागण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही. प्रतिवादी क्र.५ यांनी त्यांना कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नसताना सदर खरेदी व्यवहाराच्या नोंदीचा

फेरफार क्र.११८१८ याबाबत हरकत घेतली त्याप्रमाणे मंडळ अधिकारी यांनी ती नोंद रद्द केली. त्यानंतर आर.टी.एस. अपील क्र.१६/२०१७ मध्ये मा. उपविभागीय अधिकारी यांनी अपील अंशतः मान्य करून तहसिलदारांकडे फेर चौकशीसाठी पाठविले आहे. सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ यांनी महसूल अधिकाऱ्यांसमोर त्यांनी त्यांच्या हिश्याचा ५ आणे ४ पै चा हिस्सा प्रतिवादी क्र.६ यांना मुलीच्या लग्नाच्या खर्चासाठी विक्री केला आहे असा जबाब दिलेला आहे. त्यामुळे वादीला त्याबाबत वाटपाचा दावा दाखल करण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. प्रतिवादी क्र.१ ही वाटपाने दावा मिळकतीचे मालक झाले होते. त्यामुळे त्यांना ती मिळकत तबदील करण्याचे पूर्ण अधिकार होते. तसेच, सदर दाव्यास मुदत कायद्याची देखील बाधा येते. यास्तव त्यांनी सदर दावा दिवाणी प्रक्रिया संहिताचा आदेश ०७ नियम ११ अन्वये फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**(०५).** सदर अर्जावर वादीने निशाणी क्र. ५० अन्वये म्हणणे दाखल करुन प्रतिवादींच्या अर्जातील कथने नाकारली आहेत. वादीने पूढे असे कथन केले आहे की, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.१, ४ व ५ यांची वडीलार्जित मिळकत आहे. वादींचा त्यामधील हिस्सा डावलण्याच्या हेतून कोणतीही आर्थिक अडचण नसताना प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी संगनमताने दावा मिळकत प्रतिवादी क्र.६ यांना खरेदी दिलेली आहे. सदर मिळकतीमध्ये वादींचा अविभाज्य हिस्सा आहे. यास्तव त्यांनी सदर अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे.

(०६). वादी, प्रतिवादींची कथने तसेच दोन्ही बाजुच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. दिवाणी प्रक्रिया संहिताचा आदेश VII नियम ११ च्या अर्जावर आदेश करीत असताना न्यायालयाला वादीचा दावा व त्यामधील कथने प्रथमदर्शनी पाहणे आवश्यक आहे. वादीची दाव्यातील कथने पाहिली असता वादीने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी, जाहिर ठरावासाठी व मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे असे दिसुन येते. प्रतिवादीतर्फे वकीलांनी युक्तिवादादरम्यान दावा मिळकतीचे पूर्वी वाटप झालेले आहे व त्यानुसार प्रतिवादी क्र.१ याने त्याचा हिस्सा प्रतिवादी क्र.६ यांना विक्री केला आहे असे कथन केले आहे. दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ यांची वडीलार्जित मिळकत आहे ही बाब सदर प्रतिवादी क्र.६ यांना ही मान्य आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकत मुलीच्या लग्नासाठी, कर्ज फेडण्यासाठी किंवा कौटुंबिक हितासाठी विक्री केली आहे किंवा कसे हे पुराव्याअंती अभिलेखावर येणार आहे. त्यामुळे, त्या कारणास्तव यामितीस वादीचा दावा रद्द ठरविणे उचित होणार नाही.

(०७). पुढे प्रतिवादीने दाव्यात नमूद केलेले कारण हे खोटे व बेकायदेशीर आहे असे कथन केले आहे. परंतु, दाव्यात नमूद असलेल्या वंशावळीप्रमाणे असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ व २ हे पती–पत्नी असून वादी क्र.१ हा त्यांचा मुलगा व वादी क्र.२ ही त्यांची मुलगी आहे. त्यामुळे, त्यांनी प्रतिवादी क्र.२ आईकडे वाटप मागितले व प्रतिवादी क्र.१ वडीलांनी वाटपास नकार दिला हे कारण तुर्तास तरी बेकायदेशीर वाटत नाही. तसेच, पुढे प्रतिवादीने दाव्यास मुदत कायद्याची बाधा येते असे कथन केले आहे. परंतु, त्याबाबत केवळ एका

ओळीमध्ये कथन करणे योग्य नाही. त्याकरीता वादीने कशाप्रकारे दावा मुदतीत नाही याबाबत सविस्तर वर्णन करणे आवश्यक आहे. वादीने दाव्यामध्ये झालेले खरेदीखत त्याच्या हिश्यावर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव मागितलेला आहे. सदर खरेदीखत रद्द होऊन मिळावे अशी वादीची विनंती नाही. त्यामुळे सदर दाव्यास मुदत कायद्याची बाधा येते असे दिसते. यास्तव वरील सर्व विवेचनांवरुन प्रतिवादीच्या अर्जातील विनंतीनुसार सदरचा दावा हा नाकारण्यास पात्र ठरत नाही असे माझे मत झाल्याने मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र. २ चे उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**०१.** प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

**०२.** खर्चाबाबत आदेश नाही.

SATISH YASHWANT WAKCHAURE

Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2026.06.17 17:36:08 +0530

**तासगांव.** (एस.वाय.वाकचौरे)

दिनांक : १७.०६.२०२६. सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

**तासगांव.**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्रीमती ए. एम. चव्हाण. |
| न्यायालय | – | सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,<br>तासगांव, जिल्हा सांगली. |
| दिनांक | – | १७.०६.२०२६. |
| न्यायीक अधिकारी यांनी<br>सही केलेली दिनांक | – | १७.०६.२०२६. |
| आदेश अपलोड दिनांक | – | १७.०६.२०२६. |